-११५- -१२७-

राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना १९८२ अस्थायी कर्मचारी नियमित केल्यावर त्यांच्या वर्गणीच्या वसुलीबाबत.

153

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय, क्रमांक गवियो-११८४/सीआर-५९/८४/एडीएम-५
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ नोव्हेंबर १९८४.

वाचावे:- शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक डिओआय-२०८१/४७०१/एडीएम-५, दिनांक २६ एप्रिल १९८२.

राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना १९८२ च्या परिच्छेद ३.१ अन्वये ही योजना फक्त "नियमित" राज्य शासकीय कर्मचा-यांनाच लागू आहे. राज्यातील बरीचशी कार्यालये त्यांच्या अखत्यारीत अस्थायी कर्मचा-यांची नेमणूक करतात व कालांतराने त्या कर्मचा-यांच्या सेवा नियमित करून त्यांना स्थायी स्वरूपाची नेमणूक देतात. त्याचप्रमाणे राज्य शासकीय कर्मचा-यांच्या संपाच्या कालावधीत राज्यात ब-याच कार्यालयामध्ये अस्थायी स्वरूपाच्या नेमणूका करण्यात आल्या होत्या व कालांतराने शासनाने त्या अस्थायी नेमलेल्या कर्मचा-यांच्या सेवा त्यांचा तांत्रिक सेवा खंड क्षमापित करून नियमित केलेल्या आहेत. अशा सर्व कर्मचा-यांना गट विमा योजना लागू करावी किंवा कसे तसेच त्यांच्या वर्गणीची वसुली कशी करावी याबाबत ब-याच कार्यालय/विभाग प्रमुखांनी या विभागाकडे स्पष्टीकरणात्मक सल्ला मागितला होता. या बाबीचा सर्वंकष विचार करून शासन आता खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

निर्णय:- ज्या अस्थायी कर्मचा-यांच्या सेवा नियमित करण्यात आलेल्या आहेत/येतील, तसेच ज्या कर्मचा-यांना [adhoc] "तदर्थ" आधारावर नेमणुका दिल्या असतील अशा कर्मचा-यांच्या नेमणुका/सेवा ज्या दिनांकापासून नियमित करण्यात आलेल्या आहेत/येतील [नियमित नेमणुकीचे आदेश केव्हांही निर्गमित झाले तरी] त्या दिनांकापासून त्यांना राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना १९८२, चे सदस्यत्व देण्यात येईल.

२. हे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

भि. रा. उके,
कार्यासन अधिकारी, वित्त विभाग.

जिल्हाधिकारी रत्नागिरी
-कार्यालय-
JAN1985
शाखा- AB

[कृ. मा. प.]